संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हा महाराष्ट्राच्या गुणवत्तेचा गौरव

**देशाची** केंद्रासह सर्व राज्यांमधली प्रशासन व्यवस्था काटेकोरपणे चालवायची असेल तर उत्तम दर्जाचे अधिकारी आवश्यक असतात. भारतात संसदीय लोकशाही जरी असली आणि लोकशाहीत लोकप्रतिनिधी निवडून येण्यासाठी निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जातात. देशाचा राज्यकारभार लोकप्रतिनिधींमार्फत चालवला जातो असे आपण कितीही म्हणत असलो तरी या सगळ्या राज्यकारभाराचा पाया नोकरशाही असते. म्हणजेच उत्तम दर्जाची प्रशासन व्यवस्था ही लोकशाहीची मूलभूत गरज मानली गेली आहे. संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या तिघांच्या समन्वयाने संसदीय लोकशाही व्यवस्था चांगल्या पद्धतीने काम करू शकते. विशेषतः केंद्र आणि राज्यांमधल्या वेगवेगळ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी किंवा संसद विधिमंडळामध्ये जाहीर होणाऱ्या योजना असतील किंवा केले जाणारे वेगवेगळे कायदे असतील याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता भक्कम स्वरूपाचे प्रशासन गरजेचे ठरते. कोणता कायदा आवश्यक आहे. त्या कायद्याची रचना कशी असली पाहिजे. त्याच्या अंमलबजावणीचे स्वरूप कसे असू शकेल. इथपासून ते वेगवेगळ्या योजना किंवा सरकारी निर्णय थेट गावखेड्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासकीय कारभार कार्यक्षम आणि गतिमान असणे आवश्यक मानले गेले आहे. यासाठीच भारतीय प्रशासन सेवा म्हणजेच इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस आणि भारतीय पोलीस सेवा यांच्या माध्यमातून अतिशय कठोर स्वरूपाच्या परीक्षा घेतल्या जातात. त्यात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या भारतीय प्रशासन सेवेमध्ये सामावून घेतले जाते. यंदाच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या आयएएसच्या परीक्षांसाठी जवळपास लाखभर विद्यार्थी देशभरात बसले होते. त्यापैकी केवळ ९ हजार ५८ विद्यार्थीच उत्तीर्ण झाले. आणि यामध्ये जवळपास साठ विद्यार्थी महाराष्ट्राचे आहेत. ही परीक्षा उत्तीर्ण होणे तितकेसे सोपे नसते. पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होण्याची संधी देशभरातून एखाद्याच्याच नशिबी येते. ९९ टक्के विद्यार्थ्यांना अनेक प्रयत्न करून मगच ही परीक्षा उत्तीर्ण होण्याची संधी मिळते. अशा या बुद्धिमत्तेची, कार्यक्षमतेची, निर्णयक्षमतेची कसोटी पाहिल्या जाणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण होता यावे म्हणून विद्यार्थी परिश्रमही घेत असतात.

### महाराष्ट्राची वाढणारी टक्केवारी

गेल्या काही वर्षातल्या भारतीय प्रशासन सेवेच्या परीक्षांमधला महाराष्ट्राचा वाढता टक्का हा खूपच समाधानकारक ठरतो. साधारणपणे गेल्या वीस वर्षांपासून हा बदल दिसून येत आहे. त्यापूर्वी या परीक्षेच्या वाटेला मराठी विद्यार्थी फारसे जातच नव्हते. दिल्ली, बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र, या राज्यातील विद्यार्थी मोठ्या संख्येने आयएएस होण्यासाठी प्रयत्न करीत राहिले आणि यशस्वीही झाले. आजही देशभरातील आयएएस अधिकाऱ्यांच्या यादीवर नजर फिरवली तर त्यात मराठी नावे फारच कमी प्रमाणात आढळतात. अगदी आपल्या महाराष्ट्रातल्या आयएएस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्येसुद्धा मराठी अधिकाऱ्यांचे प्रमाणही कमी असते. या आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती केंद्र सरकारकडून होते. आणि देशाच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये त्यांना पाठवले जात असते. तरीदेखील या सगळ्या प्रशासकीय नियुक्त्यांमध्ये मराठी अधिकाऱ्यांचे प्रमाण कमी राहत आले आहे. मात्र आता हळूहळू हा टक्का वाढतो आहे. यावेळच्या परीक्षेत साठ विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होणे आणि पहिल्या शंभर विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातल्या पाच विद्यार्थ्यांची नावे येणे ही गोष्ट महाराष्ट्र किंवा मराठीच्या गुणवत्तेचा गौरव करणारी ठरते. विशेष म्हणजे आपल्या राज्यामध्ये अशा प्रशासकीय परीक्षांसाठी उत्तम पद्धतीने मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांची संख्या खूप अल्प आहे. त्या संस्थाही गेल्या दहा ते पंधरा वर्षांमध्ये नावारूपाला आलेल्या आहेत. बरेच मराठी विद्यार्थी हे दिल्लीतल्या अनेक वर्षे सुरू असलेल्या आणि नावाजलेल्या कोचिंग क्लासेसमध्ये तयारीसाठी जातात. तसे देशभरातूनही या परीक्षांच्या तयारीसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी येत असतात. दिल्लीतल्या विद्यार्थ्यांची तयारी करून घेणाऱ्या या कोचिंग क्लासेसच्या यशस्वी विद्यार्थ्यांची टक्केवारीदेखील मोठी असते. खरे तर महाराष्ट्रातसुद्धा चांगल्या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची आवश्यकता आहे. यावेळी यशस्वी झालेल्या २२ उमेदवारांना राज्य प्रशासकीय संस्थेने मोलाची मदत केलेली आहे. विशेष म्हणजे अंकिता पाटील या विद्यार्थिनीने देशात १४० वा क्रमांक मिळवून महाराष्ट्राच्या यशामध्ये मोठी भर घातली आहे. उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्रातल्या या सगळ्या विद्यार्थ्यांना भारतीय प्रशासन सेवेमध्ये उत्तम कामगिरी करण्याचीदेखील संधी मिळाली आहे.

### राजकारण्यांचा संसर्ग

सरकारी यंत्रणांची कार्यक्षमता ही जशी तिथल्या कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते तशीच या यंत्रणांचे संचालन करणाऱ्या आयएएस अधिकाऱ्यांवरही असते. अनेक प्रकारच्या योजना असतात. मग शहरी भागातल्या विकासकामांबरोबरच ग्रामीण भागातल्या शिक्षण, आरोग्य किंवा पाणीपुरवठ्याच्या योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता तितकाच कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी आवश्यक ठरतो. प्रशासकीय सेवांमध्ये चांगल्या दर्जाचे करिअर करता येते, हे आता आजच्या तरुण पिढीला चांगले समजले आहे. जनसेवा असेल किंवा सामाजिक काम असेल हे स्वयंसेवी पद्धतीने करता येतेच. परंतु प्रशासकीय सेवेत प्रत्यक्ष सहभाग घेऊन सर्वसामान्यांची सेवा अधिक चांगल्या पद्धतीने करता येऊ शकते, हेसुद्धा तितकेच खरे आहे. १९२६ साली ब्रिटिशांच्या काळातच ही परीक्षापद्धत सुरू झाली होती. २६ जानेवारी १९५० ला भारत प्रजासत्ताक देश झाल्यानंतर या परीक्षा पद्धतीला अधिक संविधानिक रूप दिले गेले. म्हणजे आज ७५ वर्षांपेक्षा जास्त काळ या परीक्षा होत आहेत आणि त्यातून चांगले आणि कार्यक्षमता सिद्ध केलेले अधिकारी लाभू शकले. लोकशाही व्यवस्थेला गरजेची असलेली कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा अशा अधिकाऱ्यांमुळेच सुरू राहू शकते. अर्थात सत्ताधाऱ्यांच्या किंवा राजकारण्यांच्या सतत संपर्कात राहावे लागते. नियमबाह्य कामे करून घेण्यासाठी या अधिकाऱ्यांवर दबावही टाकला जातो. किंवा त्यांच्या मदतीने गैरव्यवहारही दडपून नेण्याचे प्रकार होतात. तेवढा दुष्परिणाम सोडला तर भारतीय प्रशासन सेवा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार ठरते.